# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक २८/०७/२०१८**

## १) खुन :-

**विमानतळ :-** दिनांक १८.०६.२०१८ रोजी चे २०.०० ते २१.३० वा. चे दरम्यान नवीन बायपास रोड महेबुबनगर ते देगलुर नाका जाणाऱ्या रोडवरील रेल्वेचे अंडरग्राउंड पुलाजवळ नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन यातील मयत नामे नितीन बबन इंगोले रा. महेबुबनगर, नवीन बायपास, नांदेड यांचा मोबाईल दिनांक १६.०६.२०१८ रोजी अर्जुन डोंगरे नावाच्या आरोपीने चोरल्याचे साक्षीदाराकडुन मयतास समजल्याने यातील मयत याने पोलीस केस करतो असे गल्लीत सांगत फिरत होता. आपल्यावर मोबाईल चोरीची केस करु नये म्हणुन अर्जुन डोंगरे याने त्याचे साथीदार यातील नमुद अरोपीतांना सोबत घेवुन यातील मयतास महेबुब नगर नांदेड येथे देशी दारुच्या अडयापासुन मयत नितीन इंगोले यास मारण्यासाठी नमुद ठिकाणी नेऊन त्याचे सोबत वाद घालुन आळीपाळीने खंजरने डोक्यात कानाजवळ वार करुन जिवे ठार मारुन त्याचा खुन केला. पुरावा नष्ठ करण्यासाठी सदरचे प्रेत एका रिअर ॲटोच्या मदतीने रेल्वे अंडरब्रिजचे रेल्वे पटरीवर नेवुन टाकले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/शेख जावेद शेख शबीर, पो. स्टे. विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १८६/२०१८ कलम ३६४, ३०२, २०१,३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि /मद्ये मो.क्र. ९०४९९१८०००** हे करीत आहेत.

## २) दरोडयाची तयारी :-

**विमानतळ :-** दिनांक २७.०७.२०१८ चे ०१.०५ वा. चे सुमारास नवीन बायपास रोड महेबुबनगर ते देगलुर नाका जाणाऱ्या रोडवरील रेल्वेचे अंडरग्राउंड पुलाजवळ नांदेड येथे आरोपीतांनी संगनमत करुन दरोडयासारखा माली गुन्हा करण्याचे उद्देशाने त्यांचे जवळ घातक शस्त्र तलवार, सुती दोरी, डुपलीकेट पिस्टल, लोखंडी टॉमी, तोंडाला बांधण्याचे काळे मास्क, मोटार सायकली, कुलूपाचे चाव्याचा गुच्छ इत्यादी दरोडा टाकण्याचे साहित्यासह किंमती ५३,१००/- रुपयाचे मालासह दरोडा टाकण्याचे तयारीत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/विनोद दयाळु दिघोरे, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १८५/२०१८ ,कलम ३९९, ४०१, ४०२, भादवी व सहकलम ४/२५, ६/१८ अर्मस ॲक्ट, कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ चोपडे , मो.क्र. ९०४९४८७७०८** हे करीत आहेत.

## ३) जबरी चोरी :-

**भाग्यनगर :-** दिनांक २६.०७.२०१८ रोजी चे २१.४५ वा. चे सुमारास सहयोगनगर नांदेड येथे, यातील फिर्यादी हा त्याचा ॲटो क्रमांक एम.एच. -२६/बी. डी. ११२७ हे घेवुन येत असतांना अजय मिसेन यांचे घरासमोर रोडवर डी. पी. जवळ सहयोगनगर नांदेड येथे आला असता पाठीमागुन बिना नंबर स्पेलेंडर प्लस त्यावर एक सरदारजी व त्याच्या मागे एक इसम वय अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील इसमाने फिर्यादीचा ॲटो उभा करुन त्यापैकी सरदारजी इसम यांने तेरे पास मे. का पेसा और क्या क्या है निकाल असे म्हणाला असता पाठीमागील इसमाने तुझ्या मायला हारामखोर तुझ्याकडे काय काय आहे ते काड असे म्हणुन खंजरने उजव्या पायावर, मांडीवर मारुन जखमी केले. फिर्यादीचे खिशातील चिल्लर व नोटा अंदाजे ५००/-रुपये व ओपो कंपणीचा मोबाईल कि. अ. १५,०००/-रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी अनिल दत्ताराव सोनटक्के, वय ३२ वर्षे व्यवसाय ॲटोचालक रा. सिडको एन. डी. १२० नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरनं २३७/२०१८ कलम ३९२, ३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/चव्हाण मॅडम , मो.क्र. ८२३७४२३००७** हे करीत आहेत.

## ४)घरफोडी :-

**अ) भाग्यनगर :-** दिनांक ०५.०४.२०१८ रोजी चे १०.३० ते ११.१० वा. .चे दरम्यान व्यंकटेशनगर घर नं १८ बँक कॉलनी वामननगर नांदेड येथे यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घराला कुलूप लावुन डयुटीला गेले असता अज्ञात चोरटयाने घराचा कडी कोंडा कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाटातील चांदीचे प्लेट व नगदी रुपये असा एकुण २२,०००/- रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी निनाद विनोद देव, वय ३४ वर्षे व्यवसाय नौकरी रा. व्यकंटेशनगर घर नं. १८ बँक कॉलनी वामननगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरनं. २३८/२०१८ कलम ४५४, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/ए. एस. काकडे, मो.नं. ९९२३१३११२१** हे करीत आहेत.

**ब) नांदेड ग्रामीण :-** दिनांक २३.०७.२०१८ रोजी चे १४.०० ते दि. २५.०७.२०१८ चे ०७.०० वा. चे दरम्यान वेळ नकी नाही फिर्यादीचे राहाते घरी महाविर चौक सिडको नांदेड येथे यातील फिर्यादी हे त्यांचे नातेवाईकाला भेटण्याकरीता हैद्राबाद येथे गेले असता कुणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे दाराचे कुलूप तोंडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मधिल लोखंडी कपाटाचे हॅण्डल लॉक व लॉकरचे लॉक तोडुन सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण १,७३,८३३/-रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी श्रीकांत त्र्यंबकराव पाचपोर, वय ५७ वर्षे व्यवसाय नौकरी रा. महाविर चौक सिडको नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं. ३३७/२०१८ कलम ४५४, ३८०, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/मोरे, मो.नं. ०२४६२-२६३३७३** हे करीत आहेत.

## ५)मो. सा.चोरी :-

**अ)भोकर :-** दिनांक २७.०७.२०१८ चे ०१.०० ते ०६.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे राहाते घरासमोरुन विश्वकर्मानगर भोकर जि. नांदेड येथे यातील फिर्यादीची हिरो पॅशन प्रो कंपनीची मो. सा. क्रमांक एम.एच.२६/बी. जे. ७४६९ अंदाजे किंमत ६०,०००/- रुपयाची आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सचिन पुरभाजी सावंत, वय ३५ वर्षे व्यवसाय नौकरी रा. बरडशेवाळा ता. हदगांव ह. मु. विश्वकर्मानगर भोकर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भोकर** गुरनं २१७ /२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२२३३ मुनेश्वर, मो.क्र. ९४२१७५८०८४** हे करीत आहेत.

**ब) कंधार :-** दिनांक २५.०७.२०१८ चे २१.०० ते दि. २६.०७.२०१८ चे ०६.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे राहाते घरासमोरुन भवानीनगर कंधार जि. नांदेड येथे यातील फिर्यादीची ॲक्टीवा ३ जी कंपनीची जुनी वापरती स्कुटी क्रमांक एम.एच.२६/ए. वाय. ८९०५ अंदाजे किंमत ३०,०००/- रुपयाची आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी मणिराव संतराम कांबळे, वय ५९ वर्षे व्यवसाय शेती रा. भवानीनगर कंधार** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरनं २१५ /२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२१७६ गुडूप, मो.क्र. ८३०८८४७६३५** हे करीत आहेत.

## ६) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**लिंबगाव :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे १८.३० वा. चे दरम्यान चिखली पाटी वसमत रोड ता. जि. नांदेड येथे यातील यातील **मयत नामे संग्राम गंगाराम वंजे, वय ५० वर्षे व्ययसाय शिक्षक, रा. तमलुर ता. देगलुर ह. मु. राजेशनगर तरोडा नाका नांदेड** हा मो. सा. ने नांदेड कडे परत येत असताना यातील आरोपी मो. सा. एम. एच. ३८/एन-७३९८ चालकाने आपले ताब्यातील वाहान हयगई व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन मयताचे मो. सा. ला जोराची धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी कविता संग्राम वंजे, वय ४१ वर्षे व्यवसाय घरकाम रा. तमलुर ता. देगलुर ह. मु. राजेशनगर तरोडा नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. लिंबगाव** गुरन ५१/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ व्ही. ए. गोटके, मो.नं. ९१४६६६३३५५** हे करीत आहेत.

## ७)विवाहितेचा छळ :-

**कंधार :-** माहे मे २०१७ ते आज पावेतो घोडज फिर्यादीचे राहाते घरी, ता. कंधार जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस व्यवसाय करणेसाठी तुझ्या माहेरकडुन २,००,०००/- रुपये घेवुन ये म्हणुन उपाशीपोटी ठेवुन, शिवीगाळ करुन, लाथा-बुक्याने मारहान करुन, शारीरीक व मानसिक छळ करुन, जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **२२ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरनं. २१६/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२५२३ लगडे, मो.क्र. ९८२३०३९०६३** हे करीत आहेत.

## ८)सकल मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अ) मुदखेड :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे ११.३० ते १२.३० वा. चे दरम्यान आमदुरा रोडवर ता. जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन सकल मराठा मोर्चातील आरोपीतांनी दंग्यास चेतावणी देवुन कट रचुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचे पुर्वनियोजन करुन हातात दगड, विटा, काठया, घेवुन पोलीसांवर दगडफेक केली. शासकीय कामात अडथळा निर्माण केला. पोलीसांचे गाडया फोडुन २,२०,०००/-रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. मा. जिल्हाधिकारी यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी सपोनि/पंडीत शंकरराव मुंढे, पो. स्टे. मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. मुदखेड** गुरन १३७/२०१८ कलम ३५३, १४३, १४७, १४८, १४९, ३३२, १२०(ब), भादवी सह कलम १३५ म. पो. का. , ३ सा. मा. नु. प्र. का. व ७ क्रिमीनल लॉ. अमेंटमेंट कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/ खंडागळे मो.क्र. ९९२३१७३३०७** हे करीत आहेत.

**ब) नांदेड ग्रामीण :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे ११.३० वा. चे सुमारास पुणेगाव येथील रोडवर ता. जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन सकल मराठा मोर्चातील आरोपीतांनी दंग्यास चेतावणी देवुन मराठा समाजास आरक्षण मिळावे या मागणी करीता सामुहीक जलसमाधी घेण्याचा इशारा देवुन मौजे पुणेगाव येथील पोलीस बंदोबस्तावरील अधिकारी व कर्मचारी यांचेवर दगडफेक करुन जखमी करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. हातात दगड, विटा, काठया, घेवुन पोलीसांचे गाडया फोडुन शासकीय मालमत्तेचे ६०,०००/-रुपयाचे नुकसान केले. मा. जिल्हाधिकारी यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/२०० नामदेव पि. शामराव मोरे, पो. स्टे. नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरन ३३८/२०१८ कलम ३५३, ३३२, ३३६, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, १०९, भादवी सह कलम १३५ म. पो. का. , ३,४ सा. मा. नु. प्र. का.कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ जाधव मो.क्र. ०२४६२-२६३३७३** हे करीत आहेत.

**क) कुंटूर :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास गंगनबिड कमाणी जवळ नायगाव ते नांदेड जाणारे रोडवर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा महामंडळाची मुखेड डेपोची बस क्रमांक एम. एच. -२०/डी. एल.१९८९ ही मुखेड ते नांदेड जात असतांना यातील नमुद आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी गैरकायदयाची मंडळी जमवुन रस्ता आडवुन मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी जय भवानी जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा, अशा घोषणा देवुन सदर समोर येवुन प्रवाशांना खाली उतरुन प्रवाशाच्या मनात दहशत निर्माण करुन त्याचे हातातील लाकडी काठया व दगडाने सदर बसच्या काचा फोडुन अंदाजे ४०,०००/-रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी अंतेश्वर यादवराव गायकवाड, वय ३९ वर्षे व्यवसाय एस. टी. चालक समता नगर मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन ११५/२०१८ कलम १४३, १४७, १४८, १४९, ३४१, ३३६, ४२७, भादवी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/९५८ डी. डी. बगाडे, मो.क्र. ७७७५९०१२७९** हे करीत आहेत.

## ९) विषारी औषध पिऊन मृत्यु :-

**मुक्रामाबाद :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे १४.३० ते १५.०० वा. चे दरम्यान मौ. गोजेगाव ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे गोंविदराव रामजी सुर्यवंशी, वय ६५ वर्षे रा. गोजेगाव ता. मुखेड जि. नांदेड** हे सततचे नापीकीला कंठाळुन कर्जबाजारी झाल्याने कोणतेतरी विषारी औषध पिऊन मरण पावला. वगैरे **खबर देणार व्यकंट गोविंद सुर्यवंशी, वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा. गोजेगाव ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुक्रामाबाद** आ.मृ. ०९/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास मपोउपनि/ जाधव, मो.क्र. ०२४६१-२६७२३३** हे करीत आहेत.

## १०) पाय घसरुन विहीरीत पडुन पाण्यात बुडून मृत्यु :-

**कंधार :-** दिनांक २७.०७.२०१८ चे १४.४५ सुमारास मौ. दिग्रस (बु) जि.नांदेड येथे यातील **मयत नामे मारोती जिवबा फुलवळे, वय ४० वर्षे रा. दिग्रस ता. कंधार** हा पाणी आणण्यासाठी शिवाजी रामचंद्र बनसोडे, यांचे वहीरीवर पाणी काढण्यसाठी गेली असता तो पाय घसरुन विहिरीत पडुन पाण्यात बुडून मरण पावली. **खबर देणार रामकिशन मारोती सातेगावे, वय ६० वर्षे व्यवसाय शेती रा. दिग्रस ता. कंधार** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कंधार** आ.मृ २९/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास पोना/२०६९ चाटे, मो.क्र. ९८६०३०६९१०** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.